**सी.एन.आर.क्र.एम.एच.बी.आय१०.०००१२२०-२००६**

.

**निशानी क्र.८० वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ च्या विरूध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ नामे द्वारकाबाई अनंतराव मेटे या दि. १०.११.२००८ रोजी मयत झाल्याने सदर मयत प्रतिवादी यांचे विरूध्द दावा अबेटमेंट करण्याबाबत आदेश झालेला आहे. दाव्यातील दावा अबेंटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तसेच मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणे हे महत्वाचे आहे. दाव्यातील प्रतिवादी विरूध्द झालेला अबेटमेंट सेट असाईडचा आदेश रद्द न झाल्यास वादीचे अपिरीमीत असे नुकसान होणार आहे. त्याकरीता दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ च्या विरूध्द झालेला दावा अबेटमेंट चा आदेश रद्द करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी प्रस्तुत अर्जात आपले म्हणणे दाखल केले व कथन केले आहे की, सदरील प्रकरणातील प्रतिवादी नं. ३ ही दि. १०.११.२००८ रोजी मयत झाली असून वादीचा दावा अबेट झाला आहे. त्यास ११ वर्षे १० महिने १८ दिवस अर्ज दिलेल्या तारखेपर्यंत झाले आहे. केवळ वादीने प्रकरण लांबणीवर टाकण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेतले म्हणून कोर्टाने कायदेशीर हुकुम केला आहे. जो आता रद्दबातल करता येणार नाही. वादीने दिलेला अर्ज कोणतेही कायदेशीर कारण न दाखविता दिला असलेमुळे खारीज करणे आवश्यक आहे नसता कमीत कमी १०,०००/- रू. कॉस्ट करण्यात यावी.

४. प्रतिवादी क्र. ५ यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ यांच्या विरूध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत केला.

५. वादी यांनी आपल्या कथनाच्या पुष्टयर्थ मयत अनंतराव पंढरीनाथ मेटे आणि मयत द्वारकाबाई अनंतराव मेटे यांचे मृत्यू प्रमाणपत्र आणि वारसांचे प्रमाणपत्र दाखल केले आहे.

६. प्रस्तुत अर्ज व म्हणणे अवालोकीले. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

वादी यांनी दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ द्वारकाबाई हया दि. १०.११.२००८ रोजी मयत झाल्याने दावा अबेट झाले संदर्भात जो आदेश पारीत झाला आहे तो रद्द करण्याकामी हा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी आपले म्हणणे दाखल केले आणि असे कथन केले आहे की प्रतिवादी क्र. ३ हे दि. १०.११.२००८ रोजी मयत झालेने त्यांच्याविरुध्द दावा अबेटचा आदेश पारीत झाला आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा सुमारे ११ वर्षे १० महिने १८ दिवस इतक्या उशिरा दाखल केला आहे. वादीने सदरचे प्रकरण लांबविण्याकरीता हा अर्ज दिला असून वादीने अर्जामध्ये कोणतेही कायदेशीर कारण नमुद केले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा नसता वादी यांना कमीत कमी रू. १०,०००/- इतकी कॉस्ट करण्यात यावी.

७. वादी यांनी आपल्या कथनाचे पुष्टयर्थ मयत प्रतिवादी क्र.३ द्वारकाबाई मेटे यांचे मृत्यू प्रमाणपत्र हे प्रस्तुत अर्जाकामी दाखल केले. मयत प्रतिवादी क्र. ३ द्वारकाबाई यांचे मृत्यूची तारीख ही दि. १०.११.२००८ अशी आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज सन २०२० साली म्हणजेच जवळपास ११ वर्षे १० महिने १८ दिवसांनतर दाखल केला आहे. वादी यांच्या अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता वादी यांनी अबेटमेंट सेट असाईड करणे संदर्भात कोणतेही संयुक्तिक कारण अर्जात नमुद केले नाही. परंतु दाव्याचा अंतिम गुणदोषावर निकाल लागण्याकरीता व दाव्यामध्ये होणारी गुंतागुंत टाळण्याकरीता वादी यांना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार एक पुरेशी संधी देणे महत्वाचे आहे. दाव्यातील दावा अबेंटमेंट सेट असाईटचा आदेश रद्द न झाल्यास वादी यांचे अपरिमीतद व कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. याउलट दावा अबेटमेंट असाईडचा आदेश रद्द केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

८. एकूणच वरील सर्व कारणांचा विचार केला असता दाव्यातील अबेंटमेंट सेट असाईडचा आदेश रद्द होणे हे न्यायदानाच्या तत्वानुसार आवश्यक आहे. सबब त्यामुळे सदरचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र आहे. त्याकरीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व ३ यांना प्रत्येकी रक्कम रू. २००/-(दोनशे रू. फक्त) ईतकी कॉस्ट देणेचे अटीवर मंजूर करणेत येतो.

दिनांक १४/०९/२०२१ (एस.व्ही.जंगमस्वामी )
२रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

Dictated on : 14.09.2021

Transcribed on : 14.09.2021

Checked & signed on : 14.09.2021

Sd/-
(S.Y. Gore)
Stenographer Grade-3,
Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.